प्रेस नोट                    दिनांक: १९/१२/२०२३

**नाताळ व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,विभागीय भरारी पथक,पुणे विभाग,पुणे या पथकाची गोवा राज्य निर्मीत अवैध मद्य वाहतुकीवर धडक कारवाई.**

---

मा. आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री. डॉ.विजय सुर्यवंशी सो, मा. संचालक (अं.व.द) राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री. सुनिल चव्हाण सो यांच्या आदेशान्वये व मा.विभागीय उप आयुक्त श्री.विजय चिंचाळकर सो यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,विभागीय भरारी पथक,पुणे विभाग,पुणे या पथकास दिनांक १८/१२/२०२३ रोजी नाताळ व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यामध्ये गोवा राज्य निर्मीत विदेशी मद्याची विक्री करण्यासाठी गोवा राज्यातून बेंगलोर- मुंबई या राष्ट्रीय महामार्गावरुन विक्रीसाठी एक आयशर कंपनीचा सहा चाकी टेंम्पो क्र. GJ 23/AW1921 या वाहनामधून होणार आहे अशी खात्रीलायक बातमी मिळालेवरुन या कार्यालयाकडील स्टाफसह दिनांक १८/१२/२०२३ रोजीच्या रात्री पासून पुणे जिल्हयातील बँगलोर - मुंबई हायवे रोडवरील, खेडशिवापूर टोलनाक्या जवळ पाळत ठेवली असता, दिनांक १९/१२/२०२३ रोजी पहाटेच्या वेळी खेड शिवापूर टोलनाक्यावर वरील वर्णनाचे वाहन आले. सदर वाहनास बाजूला घेवून वाहनातील ड्रायव्हरकडे वाहनामध्ये काय आहे याबाबत चौकशी केली असता, वाहन चालकाने वाहनामध्ये औषधे आहेत असे सांगून त्याबाबतची औषधांची बील टीपी, टॅक्स इन्व्हाईस व ई वे बिल अशी कागदपत्रे दाखविली. परंतु खात्रीलायक बातमीदाराने दिलेल्या माहितीनुसार सदर वाहनाचा क्रमांक व वर्णन यात साम्य असल्यामुळे मिळालेल्या बातमीची खातरजमा करणेकरीता सदर कंन्टेनरचे कुलुप उघडून पाहिले असता कंन्टेनरमध्ये एकुण ९५० बॉक्स मध्ये मद्याने भरलेल्या रॉयल ब्लू माल्ट व्हिस्की या मद्याच्या ब्रॅण्डच्या १८० मि.ली. क्षमतेच्या एकुण ४५६०० सिलबंद बाटल्यांचा साठा मिळून आला. सदर बाटल्यांवरील लेबलांची पाहणी केली असता त्यावर रॉयल ब्लू माल्ट व्हिस्की व उत्पादक कंपनीचे नाव पिगॉट चॅपमॅन ॲण्ड कंपनी कोलवेल इंडस्ट्रीयल इस्टेट, बारडेज गोवा असे छापलेले दिसून आले. सदर मद्याबाबत वाहन चालकाकडे मद्य वाहतूकीबाबतचा कोणताही वाहतूक पास अथवा परवाना नसल्याचे आढळून आल्याने व त्याने औषधांच्या नावाखाली गोवा राज्यात निर्मीत विदेशी मद्याची वाहतुक महाराष्ट्र राज्यात विक्री करण्याचे उददेशाने करुन फसवणूक केली असल्यामुळे त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ खाली या कार्यालयाकडे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर ठिकाणावरुन गोवा राज्य निर्मीत विदेशी मद्य अं किं. रु. ८२,०८,०००/-, एक आयशर कंपनीचा सहा चाकी टेंम्पो क्र. GJ 23/ AW 1921 अं.कि. रु. ११,५०,०००/- व इतर साहीत्य असा एकूण रु. ९३,५९,५००/- किंमतीचा मुददेमाल जागीच जप्त करुन वाहन चालक नामे विपुल देविलाल नट, वय ३२ वर्षे रा. देविलालजी नट व्हिलेज पोस्ट रोहनिया, तहसिल गांगडतलाई, रोहनिया, बांसवाडा, राजस्थान यास सदर गुन्हयामध्ये अटक करुन आज दि. १९/१२/२०२३ रोजी मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो कोर्ट क्र. ९ शिवाजीनगर जि.पुणे यांचे समोर हजर केले असता मे. न्यायालयाने सदर आरोपीस दि. २१/१२/२०२३ पर्यत ०२ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

सदर कारवाईमध्ये राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक श्री.नंदकुमार शा.जाधव, दुय्यम निरीक्षक श्री.ए.सी.फडतरे,तसेच जवान सर्वश्री.अमर कांबळे,अहमद शेख,एस.एस.पोंधे,अनिल थोरात, पी.टी.कदम भरत नेमाडे व जवान नि वाहनचालक श्री. अमोल दळवी यांनी सहभाग घेतला असून गुन्हयाचा पुढील तपास विभागीय भरारी पथकाचे दु.निरीक्षक श्री. ए.बी.पाटील हे करीत आहे.


VINSUM
GOODS
CARRIAGE
GOODS CARRIER
GJ23
AW1921
WHISKY